बाळा जो जो रे ऽऽऽ अंगाई गीतांच्या हिंदोळ्यावर...

हृदयस्पर्शी, हळुवार अंगाई गीतांचं खास स्थान प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात असतंच. तान्ह्या बाळाला जोजवणारी आई हे जगातलं सगळ्यात सुंदर शिल्प असेल. अशा आठवणीतल्या काही अंगाई गीतांची सफर...



नूतनची अंगाई ऐकत मोहनीश मोठा झाला.

अभिनेता म्हणून फार थोडी, पण खलनायक म्हणून अधिक लोकप्रियता मिळवणाऱ्या मोहनीश बहलची एक मुलाखत नुकतीच छोट्या पडद्यावर पाहण्यात आली. कदाचित तुम्हीही ती पाहिली असेल. त्यात आपल्या कौटुंबिक जीवनाबद्दल बोलताना मोहनीशने एक मजेशीर आठवण सांगितली. तो म्हणाला, 'लहानपणी घरगुती समारंभांसाठी आम्ही एकत्र येत असू तेव्हा बरेचदा माझ्या आणि काजोलच्या तोंडी एकच गीत असायचं. आजही आम्हा दोघांना ती धून खूप आवडते.'

एकदा त्याने आपली आई नूतनला सहज या योगायोगाबद्दल सांगितलं. तेव्हा नूतन खळखळून हसली होती आणि मोहनीशला म्हणाली, 'ती धूनच तशी आहे. ज्या चित्रपटातलं ते गाणं आहे त्यात मी आणि तुझी मावशी (तनुजा) एकत्र काम करत होतो. आम्ही बहिणी-बहिणीच झालो होतो. त्यावेळी तुम्ही लहान होतात. तुला झोपवताना मी जे गाणं गुणगुणायचे तेच तनुजा काजोलला झोपवतानाही गायची.'

गालावर हळुवार मोरपिस फिरवल्यासारखे त्या गीताचे बोल सुंदर आणि चाल मधुर होती. ते एक अंगाई गीत होतं. हिंदी चित्रपट गीतांत लोरी म्हणजेच अंगाई गीतांचंही महत्त्व आहे. तर मोहनीश-काजोल या भावंडांच्या आवडत्या अंगाई गीताचे बोल आहेत–

नन्हीं परी सोने चली हवा धीरे आना...
नींद भरी पंख लिए झुला झुला जाना...

कधी दिवसभरच्या थकव्याने शिणलेल्या मनाला ताजंतवानं करायचं असेल तर हे गीत ऐका. शब्दाशब्दासरशी तुमचे डोळे पेंगुळतात की नाही पहा. तुम्ही सुखद निद्रेच्या अधीन कधी होता ते समजणारही नाही. बालपणीच्या रम्य आठवणी ताज्या करणारी अंगाई गीतं आपल्या जीवनाचा एक अविभाज्य भाग आहेत.

परमेश्वराची आळवणी करणारी भक्तिगीतं जशी पवित्र वाटतात आणि स्वर्गीय सुखाची अनुभूती देतात तसाच काहीसा अनुभव अंगाई गीतं ऐकतानाही येतो. मातृत्वाबरोबरच आईच्या ओठी अलगद अंगाईगीत येतं. त्यासाठी तिने लताजी किंवा नूतनसारखंच गायला हवं असं नाही.

आजही घराघरातून तानुल्याला झोपवताना, 'लिंबोणीच्या झाडामागे चंद्र झोपला ग बाई आज माझ्या पाडसाला झोप का ग येत नाही...' अशी आर्जवं करणारे आईचे सूर ऐकू येतात. आज आपण अशाच लोकप्रिय अंगाई गीतांबद्दल गप्पा मारणार आहोत.

ज्या अंगाई गीताने लेखाची सुरुवात केली त्या 'नन्ही परी सोने चली...'बद्दल आधी बोलू या. *सुजाता*मधलं हे गीत. नूतनसाठी शोभना समर्थने चित्रपट बनवला. त्यात तनूजाला लाँच करायचं होतं. निर्मिती शोभना समर्थचीच होती. सेटवर ज्याच्या त्याच्या तोंडी "नन्ही परी...'असायचं. एकदा नूतन सहज आपल्यापेक्षा वयाने लहान असलेल्या आर. डी. बर्मनना म्हणाली, 'पहा ना, बाबांनी किती सुंदर चाल दिलीय या गीताला.'

त्यावर पंचमदा उपहासाने हसले. नूतनने खोदून खोदून विचारल्यावर त्यांनी गौप्यस्फोट केला की, 'ही चाल बाबां (एस.डी.) नी एका भटियाली लोकगीताचे स्वर इकडे तिकडे करून बांधली आहे.'

'कसं शक्य आहे?' नूतनने नाराज होत विचारलं.

'हे गीत माझ्या आईच्या तोंडी ऐकत ऐकतच मी मोठा झालोय,' पंचमदा शांतपणे उत्तरले.

आज ना नूतन राहिली न बर्मन पिता-पुत्र. पण त्यांनी रचलेलं हे अंगाई गीत आजही तेवढंच मधुर आणि कर्णप्रिय आहे.

नूतनबद्दल बोलतो आहोत तर तिच्याच आणखी एका चित्रपटाची आठवण आली. *खानदान* नावाचे चार चित्रपट आले. पण आपण दिग्दर्शक भीमसिंगच्या *खानदान* (१९६५) मधलं गीत पाहू या. त्यात नूतन, सुनील दत्त, प्राण, ललिता पवार आणि ओम प्रकाश असे बिनीचे कलाकार होते– त्यातल्या एका लोकप्रिय गीताचे बोल होते.

तुम्हीं मेरे मंदिर, तुम्हीं मेरी पूजा
तुम्ही देवता हो...

या गीताच्या एका अंतऱ्यात राजेंद्र कृष्णनी लिहिलं होतं–

बहोत रात बीती चलो मैं सुला दूं
पवन छेडे सरगम मैं लोरी सुना दूं...

व्यथित जोडीदाराच्या मनाची तगमग कमी व्हावी म्हणून त्याची अर्धांगिनी अंगाई म्हणून त्याला झोपवतेय अशी सुंदर कल्पना या गाण्यात आहे. पतीविषयीच्या तिच्या प्रेमाची ऋजूता शब्दाशब्दातून व्यक्त होते. बोलांप्रमाणेच संगीतकार रवीनेही हळुवार संगीत देऊन गीताची नजाकत वाढवलीय.

योगायोग पहा, दोन वर्षांनंतर म्हणजे १९६७मध्ये *मिलन* चित्रपट प्रदर्शित झाला. तसे *मिलन* नावाचेही तीन चित्रपट आले. पण आपण १९६७च्या प्रसाद प्रॉडक्शनच्या ए. सुब्बाराव दिग्दर्शित *मिलन*बद्दल बोलतोय. त्यातही नूतन, सुनील दत्त, प्राण वगैरे कलाकार होते. योगायोग असा की *खानदान*मध्ये पतीला झोप यावी म्हणून पत्नी अंगाई म्हणते तर इथे *मिलन*मध्ये झोप यावी म्हणून तिचा पती सुनील दत्त (मुकेशच्या आवाजात) अंगाई गातो–

राम करे ऐसा हो जाये
मेरी निंदिया तो हे मिल जाये
मैं जागूं... तू सो जाये, मैं जागूं...

या गीताला लक्ष्मीकांत-प्यारेलालचं संगीत होतं.

हिंदी चित्रपटात अंगाई गीतांची सुरुवात फार पूर्वीपासून म्हणजे के. एल. सायगलपासून झाली. गेल्या ५०-६० वर्षांत *जिंदगी* नावाचे पाचपेक्षा अधिक चित्रपट येऊन गेले. आपण १९४०मध्ये प्रदर्शित झालेल्या *जिंदगी*बद्दल



हिंदी चित्रपटातलं पहिलं अंगाई गीत पुरुषाच्या अर्थात के. एल. सायगलच्या आवाजात

बोलू या. न्यू थिएटर्सच्या पी. सी. बरुआ दिग्दर्शित *जिंदगी*मध्ये सायगल, जमुना, पहाडी सन्याल, सितारादेवी, मनोरमा, निम्मो वगैरे कलाकार होते. त्यातलं सायगलच्या आवाजातलं लोरी गीत प्रसिद्ध आहे.

सो जा... सो जा...
सो जा राजकुमारी सो जा...
सो जा नैनदुलारी सो जा...

आणि इथून हिंदी चित्रपटांत लोरी (अंगाई गीत) आली. या गीताचं वैशिष्ट्य असं की ते पुरुषाच्या आवाजात आहे. सर्वसाधारणपणे अंगाई गीत आई, मोठी बहीण, वहिनी, आजी यांच्या तोंडी असतं. पण हिंदी चित्रपटातलं पहिलं अंगाई गीत पुरुषाच्या स्वरातलं आहे.

त्यानंतरही पुरुषाच्या आवाजात काही सुंदर अंगाई गीतं मिळाली. मगाशी *मिलन*मधलं गीत पाहिलं ते मुकेशच्या आवाजात होतं. दुसरं असंच एक सुंदर अंगाई गीत *शबाब* (१९५४) चित्रपटातलं जे पुरुषाच्या आवाजात आहे.

एम. सादिक दिग्दर्शित *शबाब*मध्ये भारतभूषण, नूतन, बद्रीप्रसाद, श्यामकुमार, यशोधरा काट्जु वगैरे कलाकार होते. यातलं अंगाई गीत थोडं वेगळ्या संदर्भात आहे. नूतन एक राजकुमारी असते. तिला निद्रानाशाची समस्या असते. अनेक उपचार करूनही गुण येत नाही. त्यावेळी एक संगीतकार येऊन अतिशय भावपूर्ण अंगाई गीत गातो आणि अनेक महिन्यांनंतर राजकुमारीला शांत झोप लागते. नौशादच्या संगीतात हेमंतकुमारने ते गायलंय. ज्याचा मुखडा याप्रमाणे आहे–

चंदन का पलना रेशम की डोरी
झुला झुलावे...

हेमंतकुमारने आपल्याच संगीतात आणखी एक लोरी गायलीय. *एक ही रास्ता* (१९५६) नावाचा बी.आर. चोप्रा दिग्दर्शित चित्रपट प्रदर्शित झाला त्यात अशोककुमार, मीनाकुमारी, सुनील दत्त, डेझी इरानी, जीवन, यशोधरा काट्जु वगैरे दिग्गज मंडळी होती. गीताचा मुखडा याप्रमाणे होता–

भोला बचपन सो जा
नन्हें मेरे, तू सो जा...

हे गीत दोन भागांत होतं. हेमंतकुमारच्या चाहत्यांना संग्रही ठेवण्यासारखं आहे.

लताच्या आवाजातली अनेक अंगाईगीतं लोकप्रिय ठरली. त्यांची खरी सुरुवात मास्टर भगवान यांच्या *अलबेला* (१९५१) ने झाली. या गीताविषयी 'जी'मधून याअगोदरच लिहिलं गेलंय. म्हणून अधिक खोलात न शिरता आपण फक्त गाण्याचाच उल्लेख करू या. त्याचे बोल होते–

धीरे से आ जा री अंखियन में
निंदिया आ जा रे आ जा...

आणखी एका गीताचा उल्लेख केल्याशिवाय हा लेख पूर्ण होऊच शकत नाही.

आज कल में ढल गया
दिन हुआ तमाम
तू भी सो जा, सो गई
रंगभरी शा...म...

१९६४ मध्ये प्रदर्शित झालेल्या एल. व्ही. प्रसाद दिग्दर्शित *बेटी बेटे*या सामाजिक चित्रपटातलं हे गीत. सुनील दत्त, सरोजा देवी, जमुना, मेहमूद, जयंत (अमजद खानचे वडील), बेबी फरीदा आणि मास्टर शहीद अभिनीत या चित्रपटाला शंकर-जयकिशननी संगीत दिलं होतं. शेवटच्या क्षणी दिग्दर्शकाने या गीताला कात्री लावण्याचा निर्णय घेतला. त्यावेळी बेबी फरीदा आणि मास्टर शहीदनी एकीकडे जयंतसाहेब आणि दुसरीकडे सुनील दत्तद्वारा एल. व्ही. प्रसादना विनंती केली की चित्रपटाची लांबी वाढत असेल तर मेहमूदअंकल आणि शुभा (खोटे) आंटींची थोडी विनोदी दृश्यं कमी करा, पण हे गीत कापू नका. आणि त्यांच्या विनंतीला मान देऊन हे अंगाईगीत चित्रपटात राहू दिलं होतं.

सगळ्यात जास्त अंगाईगीतं लताच्या आवाजात आहेत आणि सर्वाधिक अंगाईगीतांना संगीत देण्याचा मान रवीला मिळालाय.

□ अजित पोपट